किरकोळ फौजदारी खटला

क्र. ७९/२०२४

**फिर्यादी सुहासिनी सुरेश अंबेप यांचा फौजदारी प्रक्रिया संहिता २०० प्रमाणे शपथेवर जबाब मार्फत विधिज्ञ आनंद एस. चव्हाण यांचेमार्फत**

मी सध्या विश्रांतवाडी कळस या ठिकाणी राहते. राहत्या ठिकाणचा सर्वे क्र. ११६/१अ आहे. जागा दीड गुंठयापेक्षा थोडीशी कमी आहे. सदर जागा मी बनारसी अग्रवाल यांच्याकडुन विकत घेतलेली आहे. त्यानंतर मी त्यावर स्वतःच्या खर्चाने बांधकाम केलेले आहे. त्याठिकाणी मी, माझे दोन मुले, सुना व नातु राहतात. मला दोन मुली आहेत. आरोपी या माझ्या दोन मुली आहेत.

२. सन २०१९-२०२० मध्ये एके दिवशी माझ्या मुली आरोपी हया माझेकडे आल्या व आपण देवाकडे जावू म्हणाल्या. त्यामुळे मी त्यांचेसोबत रिक्शाने गेले. त्यांनी मला सरकारी कार्यालयात नेले. त्यांनी आतमध्ये काय विचारले व काय बोलले याबाबत मला काही माहिती नाही. त्याठिकाणी दोन्ही मुलींनी कागदावर सहया केल्या व मला बोलावून सही करण्यास सांगितले. मला त्यांनी बचत गटाची सही असल्याचे सांगितले. त्यामुळे मी त्यांचे सांगण्यावरुन सही व अंगठा केला. त्यानंतर त्यांनी मला घरी आणले. त्यांनी मला देवाला नेले नाही.

३. त्यानंतर दोघी मुली आरोपी सन २०२३ मध्ये माझ्या घरी आल्या व मला आणि माझ्या भाडेकरुला भांडु लागल्या. त्यानंतर मी माझे दोन्ही मुलांसोबत विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द तक्रार देण्यासाठी गेले. त्याठिकाणी मला आरोपींनी माझे जागेचे राहत्या घरासह बक्षिसपत्र बनुन घेतल्याचे मला समजले. त्यांनी बक्षिसपत्र मला फसवून करवून घेतले आहे.

४. त्यानंतर मी चौकशी करुन सगळे कागदपत्रे जमा केले. त्यानंतर मी पोलीस आयुक्त कार्यालयात गेले व आरोपीविरुध्द तक्रार केली. त्याठिकाणी आरोपी मला फसवुन बक्षिसपत्र केल्याबाबत कबूल झाले. त्यानंतर आरोपी काहीही बोलल्या नाहीत म्हणुन मी परत पोलीस

12/09/24

आयुक्त कार्यालयात गेले. पोलीसांनी त्यांना बक्षीसपत्र ठेवू नका रद्द करा असे सांगितले. त्यांनी आजपावेतो बक्षीसपत्र रद्द केले नाही. त्यानंतर आम्ही परत पोलीस आयुक्त कार्यालयात गेलो. त्यांनी न्यायालयात जाण्यास सांगितले म्हणुन न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. मला माझी जागा मिळावी व आरोपीला शासन व्हावे ही मागणी आहे.

..................................

फिर्यादीची सही

समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

12/09/24

(श.गि. दुबाले)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

खडकी, पुणे

दिनांक – १२/०९/२०२४